(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमद्धे**

**फौजदारी अपील अधिकारिता**

**फौजदारी अपील क्रमांक ८३६ /२०२१**

**सह**

**फौजदारी अपील क्रमांक ८३६/२०२१**

**मधील**

**अंतरिम अर्ज क्रमांक २४३९/२०२१**

संभाजी उत्तम सूर्यवंशी ] .. अपीलकर्ता

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि अन्य ] .. उत्तरवादी

कु. अंजली पाटील, अपीलकर्त्यासाठी.

डॉ. अश्विनी टाकळकर, राज्यासाठी अतिरिक्त सरकारी अभियोक्ता.

श्री. सत्यजित राजेशिर्के सोबत शुभम वासेकर उत्तरवादी क्रमांक २ साठी.

**न्यायमंच : न्या. भारती डांगरे आणि**

**न्या. मंजुषा देशपांडे**

**राखीव ठेवल्याचा दिनांक : २१ ऑक्टोबर २०२४**

**घोषित केल्याचा दिनांक : १४ डिसेंबर २०२४**

**न्यायनिर्णय (न्या. भारती डांगरे द्वारा) :-**

१. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (संक्षिप्ततेसाठी "पॉक्सो अधिनियम") या स्वरूपात एक विशेष कायदा दहा वर्षांपूर्वी करण्यात आला असला, तरी केवळ ३ वर्षांचे आणखी एक मूल एका किळसवाण्या, तिरस्कृत आणि तिटकारा येणाऱ्या कृत्याला बळी पडले होते आणि यावेळी तिच्याच जैविक पित्याच्या हातून झाले होते. या घटनेनंतर वर्षानुवर्षे ती लहान मुलगी स्वतःशीच विचार करत होती की, ज्या माणसाने तिला जन्माला घातल, जरी त्याच्याकडून तिच रक्षण होण आणि तिच संगोपन करण अपेक्षित असताना ज्यातून खुलून एक स्त्री मध्ये रूपांतर झाली असती अशा मनुष्या पासून ती शीलभ्रष्ट झाली. तो काय करतोय हे ही तिला कळत नसताना त्याने तिला शीलभ्रष्ट केल ; तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत त्याने तिचे शोषण केले, तिच्या आत्म्याचे तुकडे-तुकडे केले. आमच्यासमोर एक अपीलकर्ता, आरोपी पिता आहे, ज्याला न्यायचौकशी करण्यासाठी न्यायालयासमोर आणले आहे आणि न्यायचौकशी न्यायालयाने त्याच्या गुन्ह्याचा निष्कर्ष नोंदवून आणि त्याला योग्य शिक्षा ठोठावून शिक्षा दिली आहे.

२. आपिलकर्ता, अडीच वर्षांच्या मुलीचे वडील, यांच्यावर विशेष न्यायाधीश (पॉक्सो) आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश , पुणे यांनी विशेष (पॉक्सो) प्रकरण क्रमांक १०७/२०१८ मध्ये आपल्याच मुलीवर वारंवार बलात्कार केल्याचा दोषारोप ठेवला होता आणि त्यामुळे अपीलकर्ता भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ३७६ (२) (एफ) (आय) (एन) अन्वये

तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ५ (एल) (एम) (एन) तसेच कलम ६ अन्वये शिक्षेस पात्र आहे. त्याच्यावर भादंवि कलम ३२३ आणि ५०६ अन्वये ही दोषारोप ठेवण्यात आला.

त्याने गुन्हा कबूल न केल्याने त्याच्यावर वरील आरोपांखाली खटला चालवण्यात आला.

३. अभियोग पक्षाच्या बाजूने ५ साक्षीदार तपासण्यात आले, ज्यात पीडितेची आई म्हणजेच आरोपीची पत्नी रेणुका, माहिती देणारी, एक पंच साक्षीदार सुनील चव्हाण, दोन वैद्यकीय अधिकारी, स. सा. ३ ( सरकारी साक्षीदार) डॉ. राघव अरोरा आणि स. सा. ४ डॉ. युग मोहन यांचा समावेश होता, ज्यांनी पीडित मुलीची तपासणी केली होती आणि तिला ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेले असता कथित लैंगिक अत्याचारावर आपले मत व्यक्त केले होते. माहिती देणाऱ्याचा जबाब नोंदविण्यासह तपास करणाऱ्या तपासी अधिकारी पोलिस उप- निरीक्षक मधुमती शिंदे यांची स. सा.५ म्हणून तपासणी करण्यात आली.

आरोपींवरील आरोपांच्या समर्थनार्थ अभियोग पक्षाच्या साक्षीदारांनी न्यायचौकशी करणाऱ्या न्यायाधीशांसमोर साक्ष दिल्यानंतर असा निष्कर्ष काढण्यात आला की, अभियोग पक्षाच्या साक्षीदारांचे पुरावे तर्कप्रबळ, विश्वासार्ह आणि स्वीकार्य आहेत आणि क्षुल्लक भांडणाच्या कारणास्तव किंवा इतर कोणत्याही कारणास्तव आपल्याला खोट्या पद्धतीने अडकवण्यात आले आहे हे सिद्ध करण्यात आरोपी अपयशी ठरला आहे. पहिली माहिती देणारी व्यक्ती म्हणजे त्याची स्वत:ची पत्नी त्याला खोट्या पद्धतीने अडकवण्याचे कारण नाही, आणि तिची साक्ष विश्वासार्ह आणि वैद्यकीय पुराव्यांद्वारे समर्थित असल्याचे पाहून त्याच्या

दोषी हेतूबद्दल आणि सदोष मनःस्थितीबद्दल एक अनुमान काढला गेला.

अभियोग पक्षाचे पुरावे सुसंगत आहेत आणि साक्षीदारांनी एकमेकांना दुजोरा दिला आहे, कोणत्याही संशयाला वाव नाही, असे नोंदवून असा अनुमान काढण्यात आला की अभियोग पक्षाने दोन वर्षांच्या पीडितेवर तिच्याच वडिलांनी बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा खटला सिद्ध केला आहे आणि या कृत्याची पुनरावृत्ती झाली आहे.

त्यामुळे आरोपीला पॉक्सो कायद्याच्या कलम ६ सह भा. दं. वि. कलम ३७६ (२) (एफ) (आय) (एन) आणि भा. द. वि. च्या कलम ५०६ अन्वये दोषी ठरवण्यात आले.

शिक्षेवर आरोपीचे म्हणणे ऐकून आणि अल्पवयीन मुलीवर अयोग्य कृत्य करणारा दुसरा कोणी नसून तिचाच बाप आहे, ज्याने अमानुष आणि तिरस्करणीय कृत्य केले आणि कोवळ्या वयाच्या पीडितेला आघात सहन करावा लागला, जो आयुष्यभर तिच्यासोबत राहील, अशा प्रकारचे गुन्हे दिवसेंदिवस वाढत असल्याने आणि लहान वयाची मुले त्यांच्या घरातही सुरक्षित नाहीत, ही पृथ्वीवरील सर्वात सुरक्षित जागा मानली जात असल्याने कोणतीही उदारता दाखवणे योग्य नाही, पॉक्सो कायद्याच्या कलम ६ अन्वये दंडनीय भादवी च्या कलम ५ (एल) (एम) (एन) अन्वये दोषी ठरल्याने आरोपीला रु.८,०००/- च्या दंडासह जन्मठेपेची आणि त्यात कसूर केल्यास केल्यास ६ वर्षे साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यात आली. भा. द. वि. च्या कलम ५०६ अन्वये दोषी ठरल्यास स्वतंत्र शिक्षा सुनावण्यात आल्या असून, शिक्षा एकाच वेळी भोगण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

०६/१२/२०१७ पासून म्हणजे अटकेच्या तारखेपासून तो कोठडीत असल्याने त्याला आधीच भोगलेल्या मुदतीसाठी वजावट देण्यात आली.

४. दोषसिद्धीच्या निष्कर्षामुळे आणि ठोठावण्यात आलेल्या शिक्षेमुळे व्यथित होऊन प्रस्तुत अपील दाखल करण्यात आले असून, हा आक्षेपित निर्णय अभिलेखावरील पुराव्यांचे आकलन करण्यात अपयशी ठरला आहे आणि काढलेला निष्कर्ष केवळ वैधानिक तरतुदींनी घालून दिलेल्या तत्त्वांच्याच विरोधात नाही, तर सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याच्या तत्त्वांच्या विरोधात आहे, या कारणास्तव तो उलट फिरवण्याची मागणी केली गेली, अभियोग पक्षाची बाजू पुरेशी सिद्ध करण्यासाठी रेकॉर्डवर कोणतेही पुरावे नाहीत, असे उद्युक्त करण्यात आले. पती-पत्नीमध्ये वैवाहिक वाद आणि मतभिन्नता आणि भांडण आहे आणि म्हणूनच सूडबुद्धीने तिने खोटी तक्रार दाखल केली आहे, असेही अपील मेमोमध्ये म्हटले आहे.

पॉक्सो अंतर्गत पीडित मुलीची महिला डॉक्टरांकडून तपासणी होणे आवश्यक असले तरी, पीडितेची वैद्यकीय तपासणी स. सा. ३ द्वारे करण्यात आली. शिवाय, स. सा.१ या प्रथम माहिती देणाऱ्याच्या उलटतपासणीतून ज्या सुधारणा आणि त्रुटी रेकॉर्डवर आणल्या जातात, त्याही तिच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचे कारण म्हणून मांडल्या जातात. शिवाय पीडितेचा वैद्यकीय अहवाल ही शिक्षा टिकवण्यासाठी पुरेसा नाही, असाही एक आधार आहे.

५. आम्ही अपीलकर्त्याच्या समर्थनार्थ विद्वान अधिवक्ता श्रीमती अंजली पाटील आणि उत्तरवादी क्रमांक २ चे वकील सत्यजित राजशिर्के तसेच राज्याचे विद्वान अतिरिक्त सरकारी अभियोक्ता डॉ. अश्विनी टाकळकर यांचे म्हणणे ऐकले आहे.

श्रीमती अंजली पाटील यांनी डॉ. राघव यांनी दिलेल्या वैद्यकीय सल्ल्याबद्दल शंका उपस्थित केली असून त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना पेटेचीयल रक्तस्त्राव आढळला असून पेरिहाइमेनल भागात जळजळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, परंतु योनिपटल शाबूत होते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, जर पीडित व्यक्ती १० ते १२ वर्षांच्या दरम्यान असेल तर योनिपटल फाटलेले नसते, परंतु उलटतपासणीत त्याने कबूल केले आहे की जखमेचा लालसरपणा १४ दिवसांपर्यंत राहील.

श्रीमती पाटील यांच्या मते, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केवळ पेटेचीयल रक्तस्रावाच्या आधारे योनीतून जळजळ होण्याचे जे मत दिले आहे ते अशास्त्रीय आहे. त्यांनी असे सादर केले की वैद्यकीय अधिकारी यांचे सूचक योनि प्रवेश निष्कर्षाबद्दल असे मत आहे की त्यामुळे योनिपटल फाटने, लॅबिया, माजोरा आणि मिनोरा वर जखमा झाल्या असाव्यात आणि पीडितेच्या बाजूने संघर्ष आणि तिच्या अंगावर काही जखमा असावयास हवे , परंतु या संदर्भातील कोणत्याही सकारात्मक निष्कर्षाच्या अभावी योनी प्रवेश सिध्द्ध होत नाही.

के. नारायण रेड्डी यांनी लिहिलेल्या एमयूएचएसने मान्य केलेल्या पाठ्यपुस्तकातील, ३४ [व्या] आवृत्ती च्या आवश्यक उताऱ्यावर त्यांनी भरवसा ठेवला आहे, ज्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की,

"योनिपटलाचे फुटणे पहिल्या संभोगासह होते जे बलात्काराचा मुख्य पुरावा आहे".

याव्यतिरिक्त, लेखकाने आंतरराष्ट्रीय संशोधनावर भरवसा ठेवला आहे आणि तशी काही सामग्री रेकॉर्डवर ठेवली आहे, ज्यात कोणत्याही दुखापतीचा परिणाम नसलेल्या

पेटेचिअल रक्तस्त्रावांच्या वैद्यकीय रोगांच्या कारणांचा इतिहासाचे चित्रण केले आहे.

याशिवाय अभियोग पक्षाच्या खटल्यात मोठ्या त्रुटी आहेत, ज्याची दखल विद्वान न्यायाधीक्षांनी घेतली नाही, त्यामुळे अपराधसिद्धीचा निष्कर्ष तसेच ठोठावलेली शिक्षा मागे घेणे योग्य आहे, असा पुनरुच्चारही श्रीमती पाटील यांनी केला आहे.

उत्तरवादी क्रमांक २ चे प्रतिनिधित्व करणारे विद्वान वकील तसेच विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी या आक्षेपित निर्णयाचे समर्थन केले आहे आणि असे म्हटले आहे की आरोपी अडीच वर्षांच्या आपल्याच मुलीवर जबरदस्ती केल्याबद्दल दोषी आढळला आहे आणि वैद्यकीय पुराव्यांवरून लैंगिक अत्याचार झाल्याचे सिद्ध झाले आहे आणि वैद्यकीय तज्ञांनी स्पष्ट शब्दात साक्ष दिली आहे, पीडित मुलीची तपासणी केली असता त्यांच्या लक्षात आलेल्या लक्षणांवरून, त्यांच्या मते, न्यायचौकशी करणाऱ्या न्यायाधीशांनी अभिलेखावरील पुरावे मान्य केले आहेत आणि अपराधसिध्द्धीच्या निष्कर्षानंतर योग्य शिक्षा सुनावली आहे.

६. स. सा.१ या पीडितेच्या आईने तिची जन्मतारीख १६/०६/२०१५ सांगितली आणि नोव्हेंबर २०१७ मध्ये पीडित मुलगी अडीच वर्षांची होती, अशी साक्ष दिली. तिने आरोपीचे वर्णन तिचा पती ड्रायव्हर म्हणून काम करत असल्याचे सांगितले आणि आरोप केला की तो तिच्या मुलीसह तिला नियमितपणे त्रास देत असे.

या घटनेची साक्ष देताना तिने असे कथन केले होते की, तिने पीडित मुलीला शाळेसाठी तयार केले, पण ती शाळेत गेली नाही. दुपारी तिचा नवरा घरी परतला आणि तिने त्याला खायला जेवण दिले, जे त्याने फेकून दिले आणि शाळेत न गेल्याची नापसंती दर्शवत तरुणीवर कमरेच्या पट्ट्याने हल्ला केला. जेव्हा ती तिला वाचवण्यासाठी गेली तेव्हा त्याने

तिला मारहाण करण्यास सुरुवात केली आणि तिच्या पोटात मारल, ज्यामुळे तिला तीव्र वेदना झाल्या, कारण ती गरोदर होती.

ती घराजवळच असलेल्या स्वच्छतागृहामध्ये गेली आणि तिला परत यायला ५ ते १० मिनिटे लागली. तिला आपल्या मुलीचा किंचाळण्याचा आवाज ऐकू आला आणि जेव्हा ती बाथरूममधून बाहेर आली आणि घरात शिरली तेव्हा तिने खालीलप्रमाणे सांगितले :-

> "मी बाथरूममधून बाहेर आली आणि घरात गेली आणि पाहिले की आरोपी पीडितेच्या अंगावर झोपला होता, त्यावेळी पीडितेच्या अंगावर फक्त टॉप होता आणि तिच्या अंगावर कोणतीही पॅन्टी नव्हती. आरोपी निर्वस्त्र होता, त्याची अंतर्वस्त्रे त्याच्या मांडीपर्यंत होती आणि तो पूर्णपणे पीडितेच्या अंगावर झोपला होता. मी त्याच्यावर ओरडलो. मी त्याच्याकडून पीडितेला बाजूला घेतले. पीडित रडत होती. माझ्या पतीने मला धमकी दिली की हा प्रकार कोणालाही सांगू नका, अन्यथा तो मला आणि पीडितेला मारून टाकेल. मी तिला स्वच्छतागृहात घेऊन गेलो, मी पाहिले की तिच्या गुप्तांग (योनीला) सूज आली आहे. लालसरपणा आला होता. मी पीडितेला रुग्णालयात नेले नाही. आठ दिवसांनंतर आरोपीने पीडितेसोबत असेच कृत्य करण्यास सुरुवात केली आणि तिच्यावर जबरदस्ती केली, त्याने मला आणि पीडितेला मारहाण केली. दुसऱ्या दिवशी मी पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

७. त्यानंतर पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात नेण्यात आले, जिथे आईने आपल्या मुलीवर झालेल्या हल्ल्याचा इतिहास सांगितला आणि तपासणीपूर्वी तिची

संमती घेण्यात आली.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अन्वये स. सा. १ चा जबाब नोंदविण्यात आला, जिथे तिने न्यायालयासमोर तिच्या जबाबाशी जुळनाऱ्या घटनेचे वर्णन करणारी ३०/११/२०१७ रोजीची घटना दंडाधिकाऱ्यांना सांगितली,

८. स. सा.१ चे साक्षीपुरावे वैद्यकीय तज्ञांच्या म्हणजेच स. सा. ३ आणि स. सा. ४ च्या साक्षीपुराव्यासह वाचावे लागतील.

पुण्यातील ससून रुग्णालयात नेल्यानंतर पीडितेला मुख्य निवासी शल्यचिकित्सक डॉ. राघव अरोरा यांनी उपचार केले. पीडितेच्या आईने दिलेल्या घटनेचा इतिहास नोंदवल्यानंतर उत्तरवादी क्रमांक ४ डॉ. युगा जमदाडे यांच्या उपस्थितीत पीडितेची वैद्यकीय तपासणी केली. स. सा. ३ ने त्याच्या सरतपासणीत खालीलप्रमाणे साक्ष दिली :

> "२. इतिहास घेतल्यानंतर मी पीडितेची वैद्यकीय तपासणी केली. बाह्य जननेंद्रियाच्या भागाची स्थानिक तपासणी केली असता, माझ्या लक्षात आले की पेरिहाइमेनल भागात पेटेचीयल रक्तस्त्राव उपस्थित होता, जो दाहक बदलांचा संकेत देतो. योनिपटल शाबूत होता. इतिहास आणि वैद्यकीय तपासणी वरून निष्कर्ष योनिमार्गाच्या प्रवेशाशी सुसंगत आहेत ज्यात इतर कोणत्याही शारीरिक दुखापतीचा पुरावा नाही आणि योनिपटलाला इजा नाही. त्यानुसार मी वैद्यकीय प्रमाणपत्र दिले जे माझ्या हस्ताक्षरात आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे, मजकूर बरोबर आहे. ते निशाणी ३२ (सामूहिकपणे) येथे आहे. पीडित मुलगी २ वर्षांची होती, त्यामुळे तिचे योनिपटल शाबूत होते. १० ते १२ वर्षे वयोगटातील पीडितेच्या

लैंगिक संभोगाच्या बाबतीत, योनिपटल फाटले जाऊ शकत नाही, कारण योनिपटलांचे वैशिष्ट्य लवचिक आहे. लॅबिया माजोरा सामान्य होती."

त्यांनी विहित नमुन्यात पीडितेच्या तपासणीचे प्रमाणपत्र देखील दिले जेथे त्यांनी आवश्यक रकाने भरले आणि घटनेच्या सुमारे ६ दिवसांनंतर पीडितेची तपासणी केली याची नोंद केली आणि अभिप्रायांच्या रकान्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले :

"इतिहास आणि वैद्यकीय तपासणीचे निष्कर्ष योनिमार्गाच्या प्रवेशाशी सुसंगत आहेत ज्यात इतर कोणत्याही शारीरिक दुखापतीचा पुरावा नाही आणि योनिपटल इजा नाही."

९. स. सा. ३ च्या साक्षीपुराव्याला स. सा. ४ ने पुष्टी दिली आहे ज्याने पुष्टी केली की रुग्णाची संमती, इतिहास नमुन्यांसह तिच्या उपस्थितीत घेण्यात आला आणि वैद्यकीय तपासणीनंतर प्रमाणपत्र देण्यात आले.

स. सा. ४ दस्तऐवजाचा कर्ता नाही आणि म्हणूनच वैद्यकीय प्रमाणपत्र निशाणी ३२ वर तिची स्वाक्षरी नाही.

१०. स. सा. ३ च्या साक्षीपुराव्या बरोबर आईचा साक्षीपुरावा वाचल्यानंतर, वैद्यकीय तज्ञ ज्यांनी तिच्या वैद्यकीय स्थितीबद्दल स्पष्टपणे साक्ष दिली होती आणि इतिहास आणि वैद्यकीय तपासणीवरून असा निष्कर्ष काढला होता की योनीमध्ये प्रवेश झाला होता, ज्यात योनिपटलाला इजा नव्हती. पीडित मुलगी कोवळ्या वयाची असल्याने तिचे योनिपटल शाबूत असून १० ते १२ वयोगटातील पीडितेच्या संभोगाच्या बाबतीत योनिपटल लवचिक असल्याने तो फाटू शकत नाही, असे त्यांनी न्यायालयासमोर स्पष्टपणे नमूद केले.

महिला डॉक्टरने पीडितेची तपासणी केली असावी आणि त्यामुळे स. सा.३ ने तपासणी करणे योग्य नव्हते, अशी सूचना करून स. सा.३ ची विस्तारपूर्वक उलटतपासणी करण्यात आली.

त्याने त्याला विचारलेले सूचक प्रश्न नाकारले आणि प्रमाणपत्रातील त्याच्या निष्कर्षाला दुजोरा दिला (निशाणी ३२) जेव्हा त्याने खालीलप्रमाणे सांगून उत्तर दिले :

"वयाच्या २/२ वर्षी कीटक चावल्यास पीडितेचे गुप्तांग लाल होणे शक्य नाही. लालसरपणाची जखम १४ दिवसांपर्यंत अस्तित्वात राहील.

पीडितेची तपासणी त्यांच्याकडून झाली नसल्याची सूचना त्यांनी फेटाळून लावली.

याशिवाय त्यांनी अहवाल (निशाणी ३२) मधील निरीक्षणात स्पष्टीकरणही दिले की - १०-१२ वर्षे वयोगटातील पीडितेच्या लैंगिक संभोगाच्या बाबतीत योनिपटल लवचिक स्वरूपाचा असल्याने तो फाटला जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करून योनिपटल शाबूत असल्याचे सांगितले.

अशा प्रकारे, आम्हाला असे आढळले आहे की स. सा. १ - आईच्या कथनाला स. सा.३ ने त्याच्या अहवालाच्या संदर्भात पुष्टी दिली आहे (निशाणी ३२).

११. अपीलकर्त्याच्या विद्वान वकील कु. पाटील यांनी आमच्या समोर असे मांडण्याचा गंभीर प्रयत्न केला आहे की स. सा. १ तिच्या विसंगत कथनाच्या पार्श्वभूमीवर आणि विशेषत: ०६/१२/२०१७ रोजी दाखल केलेल्या एफआयआरमध्ये असलेल्या तिच्या कथनाचा आणि फौ. दं. सं. तेच्या कलम १६४ अन्वये दंडाधिकाऱ्यांनी नोंदवलेल्या तिच्या जबाबाच्या विरोधात स. सा. १ विश्वासार्ह नाही.

तिचा जबाब तसेच दोन कथने  काळजीपूर्वक वाचल्यावर दुर्दैवाने आम्ही हे म्हणण मान्य करू शकत नाही.

सरतपासणी मध्ये स. सा. १  ने अशी साक्ष दिली आहे की आरोपीने मारहाण करताना तिच्या पोटात लाथा मारल्या आणि त्यामुळे ती स्वच्छतागृहा मध्ये गेली.  ती आपल्या तक्रारीत आपल्या मुलीला ती शाळेत न गेल्याने आरोपीने जमिनीवर मारहाण केली आणि तिला अडवले असे जरी सांगत असली तरी तिलाही मारहाण करण्यात आल्याचे सांगत आहे.

न्यायालयासमोर तिच्या जबाबात एकच सुधारणा झाली ती म्हणजे, स. सा.१ ने साक्ष दिली की तिच्या पतीने तिच्या पोटात लाथ मारली आणि ती गरोदर होती.

आपल्या कलम १६४ खालील जबाबात,  स. सा. १  अढळ  आहे की जेव्हा तिने सांगितले की ती ३ महिन्यांची गर्भवती होती आणि आरोपीने तिच्या पोटात मारले आणि तिला वेदना होत होत्या.

माहिती देणाऱ्याचा जबाब नोंदवणारे स. सा. ५ पोलिस उप-निरीक्षक शिंदे यांनी सांगितले की, तिच्या म्हणण्यानुसार जबाब नोंदविण्यात आला, ज्याच्या आधारे एफआयआर (निशाणी १६) नोंदविण्यात आला.

दुर्दैवाने, जेव्हा तिने घटनेबद्दल साक्ष दिली  तेव्हा स. सा. १ च्या कथनात सुधारणा किंवा विसंगती सिद्ध करण्यासाठी तपास अधिकाऱ्याला कोणतीही सूचना दिलेली नाही,

स. सा. १ तिने तक्रार केलेल्या घटनेच्या महत्वाच्या पैलूशी सुसंगत आहे, असे सांगून की जेव्हा ती बाथरूममध्ये गेली तेव्हा तिला तिच्या मुलीच्या रडण्याचा आवाज

ऐकू आला  आणि जेव्हा ती आत आली तेव्हा तिने तिला अंडरवेअर शिवाय आणि तिच्या अंगावर  टी-शर्ट घातलेले पाहिले आणि आरोपी ने तिच्यावर अंडरगारमेंट खाली ओढून झोपले. तिने न्यायालयासमोर ठामपणे खालील शब्दांत सांगितले की आरोपी निर्वस्त्र होता, :-

"आरोपी निर्वस्त्र होता, त्याची अंडरवेअर त्याच्या मांडीपर्यंत होती आणि तो पूर्णपणे पीडितेच्या अंगावर  झोपला होता".

१२. स. सा. १ च्या म्हणण्यानुसार, जेव्हा तिने पीडितला बाथरूम मध्ये नेऊन तिची तात्काळ तपासणी केली, तेव्हा तिला तिच्या गुप्तांगावर (योनी) सूज दिसली आणि लालसरपणा जाणवला, परंतु तिने पीडितेला ताबडतोब रुग्णालयात नेले नाही. मात्र, पुन्हा एकदा आरोपीने घृणास्पद कृत्य करण्याचा प्रयत्न केला आणि  तिच्यावर तसेच पीडितेवर हल्ला केला असता तिने पोलिस ठाणे गाठून फिर्याद दिली.

तिला बदनाम करण्याच्या हेतूने तिच्या आधीच्या लग्नाबद्दल स. सा.१ च्या उलटतपासणीला काहीच संबद्धता नाही.   तिला दारु  पिण्याची सवय होती आणि आरोपीला घरात व्हिस्कीच्या बाटल्या सापडल्या आणि त्यामुळे भांडण झाले, असा तिला सूचक प्रश्न  विचारला असता ते सुद्धा कोणत्याही प्रकारे  परिणामकारक नाही.

घटनेच्या दिवशी आरोपी घरात उपस्थित नव्हता आणि तो गोव्याला निघून गेला होता आणि त्याने तिच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला होता, असे विशेष सूचक प्रश्न स. सा.१ ला विचारूनही तिने ते नाकबूल केल.  त्या संदर्भातील आरोपीची बाजू

स्वीकारता येणार नाही, कारण उलटतपासणीत सूचना देण्याखेरीज आरोपीकडून स्वत:ला निर्दोष सिद्ध करण्यासाठी न्यायचौकशीच्या वेळी कोणतेही निश्चित पुरावे सादर केले गेले नाहीत.

१३. लैंगिक अत्याचार, लैंगिक छळ किंवा संभोग वर्णनाच्या गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी विशेष कायदा असलेल्या लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये प्रवेश, लैंगिक अत्याचार, अति गंभीर प्रवेश, प्रवेश लैंगिक अत्याचार तसेच लैंगिक अत्याचार आणि अति लैंगिक अत्याचार यासह विविध संज्ञांना निश्चित अर्थ देण्यात आला आहे.

आरोपीवर कलम ५ (एन) अन्वये आरोप ठेवण्यात आला आहे, ज्यात मुलाच्या नातेवाइकांना, रक्ताद्वारे किंवा दत्तक किंवा विवाहाद्वारे, मुलाच्या पालकांशी किंवा मुलाबरोबर एकाच किंवा सामायिक घरात राहणाऱ्या, जो प्रवेश लैंगिक अत्याचार करतो त्याचा समावेश आहे.

या कायद्याच्या कलम १८ मध्ये जो कोणी

या कायद्याच्या कलम १८ मध्ये कोणताही गुन्हा करण्याचा प्रयत्न केल्यास शिक्षा विहीत केली आहे, जो गुन्ह्यासाठी तरतूद केलेल्या कोणत्याही वर्णनाच्या कारावसाच्या शिक्षेस पात्र असेल, ज्याचा अवधी जन्मठेपेच्या शिक्षेच्या अर्ध्या कालावधी किंवा पर्यंत किंवा, यथास्थिती, त्या गुन्ह्यासाठी तरतूद करण्यात आलेल्या दीर्घ कारावासाच्या अर्ध्या कालावधीपर्यंत किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षेच्या शिक्षेची

तरतूद करण्यात आली आहे.

१४. पॉक्सो कायद्याचे कलम २९ ही एक विशेष तरतूद आहे, ज्यात असे म्हटले आहे -:

> २९. काही गुन्ह्यांबाबत गृहीतक - या कायद्याच्या कलम ३, ५, ७ आणि कलम ९ अन्वये एखाद्या व्यक्तीवर गुन्हा केल्याबद्दल किंवा त्याला प्रोत्साहन दिल्याबद्दल किंवा प्रयत्न केल्याबद्दल खटला चालविला जातो, तर विशेष न्यायालय असे तोपर्यंत असे गृहीत धरेल की, अशा व्यक्तीने यथास्थिती गुन्हा केला आहे किंवा त्याला प्रोत्साहन दिले आहे किंवा करण्याचा प्रयत्न केला आहे, जोपर्यंत त्याच्या विरूद्ध सिद्ध केला जात नाही.

त्याचप्रमाणे आरोपीच्या सदोष मानसिक स्थितीचा आणखी एक गृहीतक कलम ३० मध्ये अस्तित्वात आहे, ज्यात असे विहित करण्यात आले आहे की या कायद्यांतर्गत एखाद्या गुन्ह्यासाठी कोणत्याही खटल्यात, ज्यासाठी आरोपीच्या सदोष मानसिक स्थितीची आवश्यकता असते, न्यायालय अशा मानसिक स्थितीचे अस्तित्व गृहीत धरेल, परंतु त्या खटल्यात गुन्हा म्हणून आरोप केलेले कृत्य आरोपीच्या बाबतीत त्याची अशी कोणतीही मानसिक स्थिती नव्हती हे सिद्ध करणे हा आरोपीचा बचाव ठरेल. जोडलेल्या स्पष्टीकरणानुसार "सदोष मानसिक अवस्थेमध्ये" हेतू, उद्देश, वस्तुस्थितीचे ज्ञान आणि एखाद्या वस्तुस्थितीवर विश्वास ठेवणे किंवा त्यावर विश्वास ठेवण्याचे कारण यांचा समावेश आहे.

१५. पॉक्सो कायद्यातील वरील तरतुदींसह, जेव्हा आरोपीवर पोक्सो कायद्याच्या कलम ६ सह कलम ५ (एल) (एम) (एन) अंतर्गत आरोप लावला जातो, तेव्हा अभियोग पक्षाने स. सा. १ च्या मार्फत अभिलेखावर आणलेले पुरावे, जी आपल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याबद्दल आरोपींवरील आरोपांबद्दल अढळ राहिली आहे, दोन वैद्यकीय तज्ज्ञांच्या पुराव्यांसह आरोपीने आपल्या अडीच वर्षांच्या मुलीवर, जी कृत्याच स्वरूप समजण्यास असमर्थ होती तिच्यावर प्रवेश लैंगिक अत्याचार केल्याचा निष्कर्ष विशेष न्यायाधीशांनी नोंदवला आहे.

विशेष न्यायालयाने अभियोग पक्षाचे प्रकरण पूर्णपणे स्वीकारताना खालीलप्रमाणे ही नोंद केली :-

> “३५. घटनेच्या दिवशी आरोपी घरी नव्हता आणि गोव्याला गेला होता आणि त्यानंतर तो दिवेआगर येथे गेला होता, हे सिद्ध करण्यासाठी पुरावे सादर करण्यात आरोपी अपयशी ठरला. दुसऱ्या बाजूस घटनेच्या दिवशी ती, आरोपी आणि पीडित व्यक्ति घरात होत्या, जेव्हा ती स्वच्छतागृहात गेली तेव्हा तिला पीडितेच्या रडण्याचा आवाज ऐकू आला आणि तिने प्रत्यक्ष घटना पाहिली, हे सिद्ध करण्यासाठी प्रथम माहिती देणाऱ्याचा पुरावा पुरेसा आणि स्वीकार्य आहे. वैद्यकीय प्रमाणपत्रात योनिमार्गाच्या प्रवेशाबद्दल स्पष्ट मत आहे आणि पीडितेच्या पेरिहाइमेनल भागात पेटेचिअल रक्तस्त्राव बद्दल निरीक्षण आहे. त्यासाठी आरोपींनी

स्पष्टीकरण दिले नाही. शिवाय, प्रथम माहिती देणाऱ्याने केवळ पैसे हडपण्यासाठी आरोपीला खोटे अडकवण्यासाठी त्याच्यावर गंभीर आरोप केले, हे विश्वासार्ह आणि स्वीकारार्ह नाही. म्हणून, मूळ तथ्ये अभियोग पक्षाद्वारे सिद्ध केली जातात आणि पॉक्सो कायद्याच्या कलम २९ आणि ३० अन्वये आरोपांचे खंडन करण्यात आरोपी अपयशी ठरले.

१६. विशेष न्यायाधीशांनी काढलेला निष्कर्ष विशेषतः या निर्णयाच्या परिच्छेद ३६ मध्ये अधोरेखित करण्यात आला आहे, ज्यात असे म्हटले आहे :-

> ३६. वरील चर्चा विचारात घेता, अभियोग पक्षाच्या साक्षीदारांचे पुरावे तर्कप्रबळ, विश्वासार्ह आणि स्वीकारार्ह असल्याचे स्पष्ट होते. क्षुल्लक भांडण किंवा आधीचे खटले किंवा इतर कोणत्याही कारणास्तव आपल्याला खोट्या पद्धतीने अडकवण्यात आले होते, हे सिद्ध करण्यात आरोपी अपयशी ठरला. वर चर्चा केल्याप्रमाणे, प्रथम माहिती देणाऱ्याने वरील कारणास्तव आरोपींना खोट्या पद्धतीने अडकविण्याचे कोणतेही कारण नाही. प्रथम माहिती देणाऱ्याचे वर्तन नैसर्गिक/समर्पक आहे. प्रथम माहिती देणारे आणि आरोपी यांच्यात कोणतेही वैमनस्यपूर्ण संबंध नाहीत. तिचे साक्षीपुरावे या घटनेबद्दल आत्मविश्वास निर्माण करणारे आहेत. तिची साक्ष विश्वासार्ह आहे आणि त्याला वैद्यकीय पुराव्यांचा आधार आहे. चार भिंतींच्या आत ही घटना घडली. याचा

विचार करता इतर साक्षीदारांची तपासणी न करणे घातक नाही. प्रथम माहिती देणाऱ्याने तत्काळ प्रथम माहिती अहवाल दाखल केला. पंचनामा तयार करण्यास उशीर झालेला नाही. आरोपींचा दोषी हेतू आणि सदोष मनःस्थिती कृत्यातूनच गोळा करता येते. त्यामुळे अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यात कोणतीही संशयास्पद परिस्थिती नाही. त्यांचे पुरावे एकमेकांशी सुसंगत आणि पुष्टी देणारे आहेत.

१७. आक्षेपित निकाल वाचल्यावर विद्वान न्यायाधीशांनी नोंदवलेल्या निष्कर्षात आम्हाला कोणतीही कायदेशीर कमतरता आढळत नाही.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपीच्या तपासणीचे आम्ही अवलोकन देखील केले आहे, जेव्हा न्यायालयासमोर आणलेली प्रत्येक गुन्ह्यात गुंतवणारी परिस्थिती आरोपीसमोर ठेवण्यात आली होती जिथे आरोपीने नकारार्थी उत्तर दिले होते. आणखी काही सांगायचे आहे का, असे विचारले असता त्यांनी खालीलप्रमाणे उत्तर दिले होते :-

> "खोटा गुन्हा दाखल केला आहे. प्रथम माहिती देणाऱ्याने माझ्याकडे १५ लाख रुपये मागितले आणि घटस्फोटाची मागणी केली. तिने मला गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली आणि त्यानुसार खोटा गुन्हा दाखल केला आणि तिने माझी फसवणूक केली."

पॉक्सो कायद्यातील अस्तितवात असलेल्या गृहीतकानुसार, अभियोग पक्षाने

आरोपीवरील आरोप निर्णायकपणे सिद्ध केल्यामुळे त्याच्या गुन्ह्याचा निष्कर्ष नोंदविला जातो.

१८. शिक्षेचा जोवर संबंध आहे तितपत विद्वान न्यायाधीशांनी आरोपीचे म्हणणे शिक्षेच्या मुद्यावर ऐकून घेतले होते आणि त्याने आपण निर्दोष असून कुटुंबातील एकमेव कमावणारा सदस्य आहे, अटकेच्या तारखेपासून तो कोठडीत आहे आणि कमीत कमी शिक्षा ठोठावून उदारता दाखविण्याची विनंती केली होती.

दुसऱ्या बाजूस, एका अल्पवयीन मुलीचे वडील असूनही त्याने हा गुन्हा केला असून ती स्त्री म्हणून बहरण्या आधीच त्याने तिच्यावर जबरदस्ती केली आणि लैंगिक अत्याचार केला, ज्यामुळे तिला आयुष्यभराचा आघात झाला, असा युक्तिवाद अभियोग पक्षाने केला. आरोपीच्या तुलनेत पीडितेच्या हिताचा समतोल साधत विशेष न्यायाधीशांना असे आढळले की, नोंदवलेल्या गंभीर परिस्थितीमुळे कठोर शिक्षेची आवश्यकता आहे आणि किमान शिक्षा ठोठावण्यासाठी कोणतेही पुरावे अभिलेखावर आणले गेले नसल्याने विशेष न्यायाधीशांनी गुन्ह्याचे गांभीर्य आणि त्याचा केवळ पीडितावर, तिच्या कुटुंबियांनवर नव्हे, तर संपूर्ण समाजावर होणारा परिणाम लक्षात घेऊन जास्तीत जास्त शिक्षा देणे योग्य मानले आणि त्यामुळे त्याला जन्मठेपेची शिक्षा आणि रु.८,०००/- दंडाची शिक्षा देणे योग्य मानले.

१९. आम्हाला दिलेल्या शिक्षेत कोणताही दोष दिसत नसल्यामुळे, आक्षेपित निर्णयात दोषी ठरल्याचे आढळल्यावर, ते कायम ठेवून, अपील फेटाळले जाण्यास पात्र

आहे आणि श्रीमती पाटील यांनी जोरदार युक्तिवाद करूनही अपीलकर्त्याला त्याच्यावरील आरोपांपासून मुक्त करणे किंवा त्याच्यावर लादलेल्या शिक्षेबाबत कोणतीही उदारता दर्शविणे आम्हाला पटत नाही.

या पार्श्वभूमीवर प्रलंबित अर्जांसह अपील फेटाळले जाते.

- x - x - x - x -

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x -